मुख्य अभियंता (पथ) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- पथ/८१
दिनांक:- १५/०५/१७

---

मा. कार्यकारी अभियंता,
एम. एस. ई. डी. सी. एल.,
पदमावती विभाग, पुणे-३७.

यांजकडेस...

विषय:- पुणे सातारा रस्त्यावर पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट ते वाळवेकर लॉन्स येथे ओपन पध्दतीने एम. एस. ई. डी. सी. एल. केबल टाकणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.
संदर्भ:- वर्कऑर्डर आ. क्र. पथ/४७ दि.२०/०४/२०१७

संदर्भांकित पत्रान्वये आपणास पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पुणे सातारा रस्त्यावर पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट ते वाळवेकर लॉन्स येथे विद्युत केबल टाकण्यास रस्ते खोदाईबाबत परवानगी देण्यात आलेली होती. सदर परवानगीची मुदत दि.३०/०४/२०१७ पर्यंत देण्यात अलेली होती. मा. महापालिका आयुक्त ठ. क्र. ६/६८ दि.०९/०५/२०१७ नुसार दि.३१/०५/२०१७ अखेर रस्ते खोदाईबाबत सर्व सेवा वाहिन्या टाकण्यासाठी मुदतवाढ देणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुसार मा. मुख्य अभियंता (पथ) जा. क्र. पथ/७४१ दि.११/०५/२०१७ अन्वये मुदतवाढ देणेबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार संदर्भांकित वर्कऑर्डर मधील नमुद रस्त्यावर दि.३१/०५/२०१७ पर्यंत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईस मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि मुळ वर्कऑर्डर मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदर रस्त्यावरील रस्ते खोदाईची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येऊन तातडीने सेवावाहीनी टाकून टेस्टींग वगैरे करून राडारोडा हलविण्याची कार्यवाही साथोसाथ करण्यात यावी. म्हणजे जेणेकरून रिईन्स्टेटमेंटची कामे खोदाई पाठोपाठ करणे शक्य होईल याची दक्षता घ्यावी व त्याप्रमाणे पथ विभागाकडील अभियंता व कंत्राटदार यांचेशी समन्वय साधून रिईन्स्टेटमेंटसाठी तातडीने रस्ते उपलब्ध करून द्यावेत. तसेच दि.३१/०५/२०१७ पुर्वी केलेल्या रस्ते

खोदाईची कामे पुर्णपणे बुजवून राडारोडा पुर्णपणे साफ करण्याची दक्षता घ्यावी. दि.३१/०५/२०१७ नंतर रस्त्यावर कोणतीही खोदाई अर्धवट राहणार नाही वा राडारोडा शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

ज्ञानेश बार्शीकर
कार्यकारी अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका

प्रत.

१. मा. मुख्य अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका.
२. मा. अधिक्षक अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस माहितीसाठी सादर...

३. श्री. राजेंद्र अर्धापुरे
उप अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी...